| **७.१ उपक्रमाचे नाव** | **छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना** |
|---|---|
| **प्रस्तावना** | आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्याचा शोध घेऊन बुद्धिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे. त्यानुसार विद्यार्थ्याचे उच्च माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण घेण्यास मदत व्हावी. आर्थिक दुर्बलतेमुळे प्रज्ञावान विद्यार्थ्याची उच्च माध्यमिक स्तरापर्यंत होणारी गळती रोखावी हा राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) या परीक्षेचा मुख्य हेतू आहे. याला अनुसरून महाराष्ट्र राज्यातील NMMS शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेले पण शिष्यवृत्ती अप्राप्त असलेल्या सदर दुर्बल घटकातील इयत्ता९ वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सारथीमार्फत शिष्यवृत्ती योजना२०२१ पासून सुरु आहे. |
| **उद्दिष्ट्ये** | १. लक्षित समाजातील इ. ९ वी ते इ. १२ वी मधील आर्थिक दुर्बल असणाऱ्या प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टिने त्यांना आर्थिक सहाय्य करणे, त्यानुसार विद्यार्थ्यांचे उच्च माध्यमिक स्तरा पर्यंतचे शिक्षण घेण्यास मदत करणे.<br>२. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील समाजातील आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांची शाळेतून होणारी गळती थांबविणे.<br>३. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या लक्षित गटातील समाजातील आर्थिक दृष्टया मागास पालकांना त्यांच्या पाल्यास शाळेत पाठविण्यासाठी उत्तेजन देणे.<br>४. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या लक्षित गटातील समाजातील आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या पालकांचा त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणावर होणा-या खर्च व आर्थिक भार कमी करणे.<br>५. शिक्षणाद्वारे मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी समाजातील आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण करणे.<br>६. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी समाजाची शैक्षणिक उन्नती होण्यास मदत करणे. |
| **पात्रतेचे निकष /अटी - शर्ती** | १. शासकीय, शासनमान्य अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील शाळांमधून इयत्ता 8 वी मध्ये NMMS परीक्षा ४१% गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.३,५०,०००/- (साडेतीन लाख) च्या आत असावे.<br>३. तहसीलदारांच्या स्वाक्षरीतील चालू आर्थिक वर्षातील उत्पन्नाचा दाखला<br>४. विना अनुदानित शाळा, केंद्रीय विद्यालय, जवाहर नवोदय विद्यालय, शासकीय वसतिगृह लाभार्थी विद्यार्थी,सैनिक शाळा या शाळेतील विद्यार्थी पात्र नाहीत.<br>५. शासकीय, शासनमान्य, अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील इयता ९ वी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी.<br>६. इयत्ता १० वी करिता शिष्यवृत्ती मिळण्यासाठी : इयत्ता ९ वी मध्ये किमान ५५% गुण |

| | |
|---|---|
| | ७. इयत्ता ११ वी करिता शिष्यवृत्ती मिळण्यासाठी: इयत्ता १० वी मध्ये प्रथम प्रयत्नात किमान ६०% गुण<br>८. इयत्ता १२ वी करिता शिष्यवृत्ती मिळण्यासाठी: इयत्ता ११ वी मध्ये किमान ५५% गुण |
| **लाभाचे स्वरूप** | NMMS परीक्षा पास झाल्यानंतर प्रती वर्षी प्रती विद्यार्थी ९६००/- प्रमाणे प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांची गुणांची अट विचारात घेऊन शिष्यवृत्ती त्यानुसार गुणांच्या अटी आधारे सलग चार वर्ष एका विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देण्यात येते. |
| **आवश्यक कागदपत्रे /प्रमाणपत्रे** | १. छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती अर्ज.<br>२. मुख्याध्यापक प्रमाणपत्र क<br>३. तहसीलदारांच्या स्वाक्षरीतील चालू आर्थिक वर्षातील उत्पन्नाचा दाखला<br>४. NMMS परीक्षा उत्तीर्ण निकाल<br>५. आधार कार्ड.<br>६. इयत्ता ९वी ते १२वी वार्षिक परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक<br>७. विद्यार्थ्याचे स्वतःचे नवे असलेले बँक पासबुक |
| **अर्ज करण्याची पद्धत** | शाळेमार्फत विहित नमुन्यातील अर्ज मुख्याध्यापकाच्या शिफारसीने आवश्यक कागदपत्रासह गटशिक्षणाधिकारी कार्यालयास सादर करणे. विद्यार्थ्याने सारथी उपकेंद्र कोल्हापूर या कार्यालयास अर्ज सादर करावेत.विद्यार्थ्याने छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती साठी केलेल्या अर्जाची छाननी व पडताळणी पूर्ण झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यास RTGS द्वारे विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये रु.९६००/- इतकी रक्कम जमा केली जाते. |
| **अपात्रतेचे निकष** | • विना अनुदानित शाळेत शिकणारे विद्यार्थी तसेच स्वयंअर्थसहाय्यित शाळेतील विद्यार्थी व<br>• ज्युनियर कॉलेज मधील विद्यार्थी .<br>• केंद्रीय विद्यालयात शिकणारे विद्यार्थी.<br>• जवाहर नवोदय विद्यालयात शिकणारे विद्यार्थी.<br>• शासकीय वसतीगृहाच्या सवलतीच्या भोजन व्यवस्थेचा व शैक्षणिक सुविधेचा लाभ घेणारे विद्यार्थी.<br>• सैनिक शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी. |
| **सन २०२१ ते २०२५ लाभार्थी संख्या** | **१,१८,८५१** |